# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र.022-28192828,

समाजविकास विभाग


जा.क्र.मनपा/स.वि.वि/27 /2026-27 दि. 23/06/2026

प्रति,

जनसंपर्क अधिकारी

जनसंपर्क विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- जाहीर सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत.......

केंद्र शासनाच्या अधिनियम 2014 नुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका करिता "तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती" स्थापन करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर समितीमध्ये दोन व्यक्तींची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठीची जाहीर सुचना सोबत जोडून देण्यात येत आहे.

तरी सदर "तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती" मध्ये दोन सदस्य नियुक्ती बाबतची जाहीर सुचना स्थानिक दोन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प)

(दिपाली जोशी)

समाजविकास अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\USERS\HP\DESKTOP\NEW LETTER\NEW LETTER PAD.DOCX(Type text)



Receipt No. 9241185(1)/2026/MBMC- Samaj Vikas (Computer No. 9241185)

Generated from eOffice by Sunil Madan Rathod, CLRK(SR)IT, CLERK, MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION on 23/06/2026 03:43 PM

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईदर (प.)

ता.जि.ठाणे-401 101. दुरध्वनी क्र.022-28192828,

**समाजविकास विभाग**


जा.क्र.मनपा/स.वि.वि/ 27 /2026-27 दि. 23/06/2026

## जाहीर सुचना

केंद्र शासनाव्दारे पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम 2014 दिनांक मार्च, 2014 रोजी लागू करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या उपरोक्त अधिनियमातील कलम 36 (1) नुसार महाराष्ट्र शासनाद्वारे महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, 2016 दिनांक 03 ऑगस्ट, 2016 रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-2014 चे कलम 20 आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, 2016 मधील प्रकरण 2 नियम क्र. 3,4 मधील तरतुदीनुसार मिरा भाईदर महानगरपालिका करिता "तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती" स्थापन करणेबाबत नमूद केले आहे. त्यानुसार सदर समितीमध्ये एक अध्यक्ष आणि इतर दोन व्यावसायिक सदस्य यांनी मिळून बनलेली असेल अशी तरतुद आहे. आणि तक्रार "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीच्या अध्यक्षांचा व सदस्यांचा पदावधी पाच वर्ष इतका असेल.

सबब "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीमध्ये 2 व्यक्तींची सदस्य म्हणून नियुक्तीसाठीची अर्हता व अनुभव खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पद व पदसंख्या | अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| 1 | तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य (2) | 1.पस्तीस वर्षाहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल |
| | | 2.मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी धारण करीत असेल |
| | | 3.तिला स्थानिक प्राधिकरणामधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल |
| | | 4. कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किवा सार्वजनिक कामांशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षाचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. |

तरी पात्र इच्छुक व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक 25/06/2026 पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह या कार्यालयात सादर करावेत. या विषयी अधिक माहिती करिता मिरा भाईंदर महानगरपालिका, समाजविकास विभाग, पहिला मजला,भाईंदर (प) येथे संपर्क साधावा.

**(मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने)**

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प)

(कविता बोरकर)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\USERS\HP\DESKTOP\NEW LETTER\NEW LETTER PAD.DOCX[Type text]



Receipt No. 9241185(1)/2026/MBMC- Samaj Vikas (Computer No. 9241185)
Generated from eOffice by Sunil Madan Rathod, CLRK(SR)IT, CLERK, MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION on 23/06/2026 03:43 PM
Scanned with OKEN Scanner